दैनिक

# महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990








लातूर वर्ष ५ वे अंक १३ शुक्रवार दि.११ जूलैं २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


## मोठे प्रकल्प सामान्य माणसांसाठी किती उपयुक्त?




मुंबई /प्रतिनिधी :- महायुती सरकारने बुलेट ट्रेन, मेट्रो, एक्स्प्रेस-वे, हायवे, समृद्धी महामार्ग, शक्तीपीठ महामार्ग यांसारखे मोठे प्रकल्प हाती घेतल्याचे नमूद करत, माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी या हजारो कोटींच्या खर्चाचा सामान्य माणसाला खरंच उपयोग होतो का, असा प्रश्न उपस्थित केला. राज्याचा विकास होतो असे आपण म्हणत असलो, तरी माणसाच्या मूलभूत सोयी सुविधा उपलब्ध होतात का, यावर विचार व्हायला हवा, असे ते म्हणाले. सत्ताधारी आणि विरोधी सदस्यांनीही यावर अनेक बाबी निर्दशनास आणून दिल्या. आज विधिमंडळात सार्वजनिक बांधकाम, नगरविकास आणि पर्यावरण व वातावरणीय बदल यांसारख्या अतिशय महत्त्वाच्या विषयांवर पुरवणी मागण्यांवर चर्चा झाली या प्रसंगी ते सभागृहात बोलत होते. राज्याच्या विधानसभेचे पावसाळी अधिवेशन सुरू असून आज बुधवार ९ जुलै २५ रोजी पुरवणी मागणी संदर्भातील चर्चेत बोलतांना माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी सरकारच्या कारभारावर प्रश्नचीन्ह उपस्थित केले. यावेळी सभागृहात सार्वजनिक बांधकाम विभागावर बोलतांना ते म्हणाले, राज्य सरकार विविध कामांवर कोट्यवधींचा खर्च करत असून, यासाठी आजवर ९ लाख कोटींचे कर्ज घेतले आहे. हे कर्ज कोण फेडणार, असा प्रश्न उपस्थित करत, सामान्य करदात्यांवरच याचा बोजा पडणार असल्याचे सांगण्यात आले. मुंबईत विकसित केलेल्या मेट्रो ट्रेनच्या स्टेशनवर पहिल्याच पावसात गळती दिसून आली, तसेच ट्रॅकवर पाणी साचले. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या कंपन्यांकडूनही दर्जेदार काम करून घेता येत नसेल, तर ही चिंतेची बाब असल्याचेही त्यांनी नमूद केले. 'टोलमुक्त महाराष्ट्र' कसा होणार, समृद्धी महामार्ग आणि टोलवर पूढे बोलतांना ते म्हणाले, एक लाख कोटींचा समृद्धी महामार्ग विकसित होणार असून, यावर अनेक ठिकाणी टोल लावला जाईल आणि तो राज्यातील जनतेने शंभर वर्षे भरायचा, असा हा सरकारचा विकास असल्याचा आरोप करत, 'टोलमुक्त महाराष्ट्र' कसा होणार, असा प्रश्न विचारला गेला. नागपूरवरून गोव्याकडे जाणाऱ्या शक्तीपीठ महामार्गाला शेतकऱ्यांकडून प्रचंड विरोध होत असतानाही सरकार यावर ठाम आहे. शेतकऱ्यांच्या विरोधाला पत्करून साधलेला हा विकास खरंच विकास आहे का, हा महत्त्वाचा प्रश्न आहे असे त्यांनी सांगीतले. मुंबईत कॉँक्रीटचे रस्ते करण्यावर भर दिला जात असून, नागपूर उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने कॉँक्रीट रस्त्यांबाबत ताशेरे ओढले असतानाही राज्याच्या विविध भागांमध्ये हे काम सुरूच आहे. हे पर्यावरणाच्या दृष्टीने योग्य आहे का, यावर खुलासा करण्याची मागणी पर्यावरण मंत्र्यांकडे करण्यात आली. कामावर अवाढव्य खर्च होत असतानाही ती वेळेत पूर्ण होत नाहीत आणि झालीच तर त्याचा दर्जाही ठीक नसल्याचे दिसून येते यावर शासनाने लक्ष देण्याची आवश्यकता असल्याचे यावेळी बोलतांना त्यांनी नमूद केले. लातूर मनपाला विकास निधी हवा शहरातील पथदिवे ही बंद लातूर शहर महानगरपालिकेत अनेक विषय अडचणीचे असून, सरकारकडून म्हणावा तितका विकास निधी उपलब्ध होत नाही. पथदिव्यांची दुरवस्था असून, केंद्राने ठरवून दिलेल्या ई.एस.एल. (एडङ) नामक कंपनीला पथदिव्यांच्या देखभाल-दुरुस्तीचे काम दिले असतानाही ती कामे केली जात नाहीत. या कंपनीबद्दल सरकार काय पावले उचलणार, हे सांगावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. दूषित पाणीपुरवठा 'दैनिक सकाळ'ने लातूरच्या पाणीपुरवठा विषयावर सलग ५० दिवस वृत्तमालिका चालवली आहे. नागरिकांना शुद्ध पिण्याचे पाणी मनपाकडून पुरवले जात नाही, जलशुद्धीकरण केंद्रावर मजूर लोक काम पाहतात. मनपाचे लातूर शहरातील पाणीपुरवठ्याकडे संपूर्णपणे दुर्लक्ष झाल्याचे यावरून दिसून येते. लातूरच्या जलशुद्धीकरण केंद्राचे शुद्धीकरण कधी होणार, गंजलेले पाईप, पाणीपुरवठा विभागाचे वॉटर ऑडिट झाले नाही, पाण्याच्या टाक्या कोरड्या आहेत, नळाला शुद्ध पाणी मिळत नाही याबाबत नगर विकास विभाग मनपाला सूचना करणार का, असाही प्रश्न यावेळी विचारण्यात आला. राज्यातील अनेक नद्यांची स्वच्छता मोहीम हाती घेतली होती, पण अनेक नद्या (उदा. मुळा-मुठा, गोदावरी, कृष्णा) अजूनही शुद्ध झालेल्या नाहीत. यावर पर्यावरण मंत्री महोदयांनी खुलासा करावा, अशी मागणी शेवटी करण्यात आली.

## पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे २०० विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

बीड/प्रतिनिधी दिनांक ८ जुलै२०२५ रोजी धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड व कोरो इंडिया ग्रासरूट नेतृत्व संस्था विकास कार्यक्रम अंतर्गत पांगरबावडी येथील मसणजोगी वस्ती येथे राष्ट्रीय शिक्षण धोरण, शालेय साहित्य वाटप, आरोग्य व नागरिकतत्व पुरावे एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली प्रियंका खोब्रागडे मुख्य कार्यकारी अधिकारी धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले.

मसणजोगी समाज भटक्या जमातीतील आहे,मसनजोगी समाजातील महिला, शालेय मूल, मुली, निराधार महिला यांनी आपल्या पाल्यांना शिकवावे , त्यांचे जन्माचे कागदपत्र ,, आधार कार्ड, मतदान कार्ड, राशन कार्ड, जातीचे प्रमाणपत्र व शाळा बाहेरील मूल व शाळेतील मुलांचा आज २०० मुल व मुली यांना वही, पेन, पुस्तक वाटप करून आज कार्यशाळा साजरी केली. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून राजू वंजारे डॉ. बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्कार प्राप्त, तसेच अभिजित वैद्य जिव्हाळा केंद्र बीड चे संचालक, विलास मगरे कोरो इंडिया मराठवाडा, अनिता वाघमारे राजकीय व सामाजिक कार्यकर्ते बीड या उपस्थित होत्या. सोबत शाहीन पठाण सामाजिक कार्यकर्ते गेवराई,शालेय शिक्षक, सामाजिक कार्यकर्ते, गट सदस्य, गट मधील महिला, पुरुष उपस्थित होते ५०टक्के मुलांना धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड यांच्या वतीने शाळेत प्रवेश मिळाला आहे, त्यांचे सर्व आवश्यक कागदपत्र मिळून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत, जिल्हाधिकारी बीड, तहसीलदार बीड यांना निवेदन देऊन एक दिवसीय कॅम्प घेण्यात आला व जास्ती जास्त मसणजोगी समाज



मधील सर्व समाजाचे कागदपत्र मिळून देण्यास प्रयत्न करत आहेत, कृष्ण संकोड, दीपक शेनूरे, सुनील उबदे, सखाराम संकोड, विजय पस्तमोड व अन्य सोबत गट मधील कार्यकर्त होते. धर्मराज बहुउद्देशीय सेवाभावी संस्था बीड चे संस्था फेलो अशोक गायकवाड, प्रियंका वाघमारे, निकिता जाधव, कोमल यादव, महेंद्र जाधव, रूपाली खोले, अंबिका कुटे, आरती कोरडे, प्रेमकुमार कोकाटे, महेंद्र जाधव,अन्य संस्था कार्यकर्ते व कर्मचारी महिला व मुल तसेच मुली उपस्थित होते. व शिक्षण , आरोग्य, व शालेय साहित्य वाटप करण्यात आले व एक दिवसीय कार्यशाळा संपन्न झाली.

## भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी सतीश मुंडे यांची नियुक्ती मंत्री ना.पंकजाताई मुंडे यांचे सतीश मुंडे यांनी मानले आभार

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन, दुग्धविकास मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खा.प्रितमताई मुंडे यांचे विश्वासू भाजपाचे माजी परळी तालुकाध्यक्ष सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री ना.पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांचे सतीश मुंडे यांनी आभार मानले आहेत. दरम्यान मंत्री पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ.प्रितमताई मुंडे यांनी आपल्यावर जो विश्वास टाकला आहे तो सार्थ करून दाखवू असे प्रतिपादन नवनियुक्त सदस्य सतीश मुंडे यांनी केले.

परळी वैजनाथ भारतीय जनता पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष, पंचायत समितीचे माजी सदस्य,भारतीय जनता पक्षाच्या संघटन वाढीसाठी योगदान देणारे अशी ओळख असलेले सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली आहे. दरम्यान, सतीश मुंडे हे लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्यापासुन निष्ठावंत कार्यकर्ते आहेत. अनेक वर्षांपासून भाजपाचे सक्रिय कार्यकर्ते आहेत. जिल्ह्यात दांडगा संपर्क असुन जनसामान्य कार्यकर्तेसोबत घेऊन चालणारे , पक्षनिष्ठा असलेले वसंघटनात्मक वाढीसाठी कठोर परिश्रम घेणारे तसेच सर्वसामान्य कुटुंबात जन्म घेऊन असामान्य कर्तृत्व निर्माण व सिद्ध करण्याची जी कला प्रत्येकाला अवगत नसते पण ती कला यांनी कमी वेळेमध्ये अवगत केली, सामाजिक, धार्मिक, राजकीय, कार्यामध्ये हिरीरीने सहभाग नोंदवत आपल्या कार्याची चुणूक दाखवून त्यांनी अनेक उपक्रम यशस्वी करून दाखवले आहेत. तालुकाअध्यक्ष या पदावर असतांना परळी तालुक्यात गाव तिथे भाजप व घर तिथे भाजपचा कार्यकर्ता या पद्धतीने काम करत चांगले योगदान देत काम केले आहे. भाजपमध्ये विविध पदांची जबाबदारी सक्षमपणे पारपाडली आहे. लोकसभा व विधानसभा निवडणुकीत प्रचारात आघाडीवर योगदान दिले आहे. गेल्या पाच वर्षात तालुकाध्यक्षपद सक्षमपने संभाळले आहे. अनेक अडचणी च्या काळातही त्यांनी आपली भूमिका चोख पणे संभाळली आहे. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली भारतीय जनता पार्टी पक्षाचे शहर तसेच ग्रामीण भागात सचोटीने पक्षवाढीसाठी प्रयत्न केले.



भाजप पक्षाची विचारधारा प्रत्येकाच्या घराघरात पोचविण्याचे काम केले. पंकजाताई मुंडे व डॉ. प्रितमताई मुंडे यांच्या कार्यप्रणाली वर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी बळकट करण्यासाठी प्रयत्न केला. त्यांच्या याच पक्षनिष्ठेची पावतीच म्हणून व त्यांनी केलेल्या कार्याची दखल घेऊन सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती केली आहे. तसेच सतिश मुंडे हे ना.पंकजाताई मुंडे व मा. खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांचे अत्यंत विश्वासू असून या पुर्वी पंचायत समिती सदस्य म्हणून त्यांनी काम पाहीलेले आहे. परळी तालुका समन्वय व पुनर्विलोकन समितीचेही ते अध्यक्ष होते. सतीश मुंडे यांची भारतीय जनता पार्टी राज्य परिषद सदस्यपदी नियुक्ती झाल्याबद्दल परळी वैजनाथसह बीड जिल्ह्यातुन राजकिय , सामाजिक, शैक्षणिक तसेच सर्वच क्षेत्रातील अनेक मान्यवरांच्या वतीने अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

ना.पंकजाताई आणि मा.खा. डॉ. प्रितमताई मुंडे यांनी भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी निवड करून माझ्यावर खुप मोठा विश्वास टाकला आहे. त्यांचा विश्वास सार्थ करून दाखवून भाजपाचे काम वाढविणार असल्याचे सांगून त्यांनी टाकलेला विश्वास सार्थ करून दाखवू असे प्रतिपादन सतीश मुंडे यांनी केले.भाजपच्या राज्य परिषद सदस्यपदी सतीश मुंडे यांची नियुक्तीबद्दल परळी मतदारसंघातील प्रत्येक गावात या निवडीचे स्वागत करण्यात आले.

## लातूरच्या बसस्थानक व डेपो स्थलांतरणाचा प्रश्न तात्काळ मार्गी लावावा: माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांची परिवहन मंत्री ना. प्रताप सरनाईक यांच्याकडे मागणी

लातूर / प्रतिनिधी :- लातूर शहर शिक्षण, कृषी आणि व्यापाराचे प्रमुख केंद्र बनले असून, शहरात दररोज ८०० ते ९०० बसची ये-जा असते. प्रवाशांची वाढती संख्या पाहता सध्याचे मध्यवर्ती बसस्थानक अपुरे पडत असून, त्याची दुरवस्था झाली आहे. त्यामुळे लातूर शहरातील मध्यवर्ती ठिकाणी तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे पार्किंग व्यवस्थेसह सुसज्ज बसस्थानक उभारण्यात यावे, त्याचबरोबर लातूर येथून महत्त्वाच्या शहरासाठी अद्यावत इलेक्ट्रिक बस सुरू कराव्यात यासह विविध मागण्या राज्याचे परिवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांच्याकडे त्यांच्या दालनात झालेल्या बैठकीदरम्यान केल्या आहेत. त्यांनी या सर्व मागण्यांना अनुकूलता दर्शवत संबंधितांना सूचना केल्या आहेत. परिवहन विभागाच्या संदर्भाने लातूर शहर व जिल्ह्यातील विविध मागण्यांची निवेदने परिवहन मंत्री ना. प्रतापजी सरनाईक यांच्याकडे वेळोवेळी देण्यात आली आहेत, या सर्व निवेदनावर विचार करून निर्णय घेण्यासाठी त्यांनी आज बुधवार दि. ९ जुलै २५ रोजी त्यांच्या दालनात संबंधित अधिकाऱ्यांच्या बैठकीचे आयोजन केले होते.

परिवहन मंत्र्यांच्या दालनात आढावा बैठक: राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या दालनात राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण सांस्कृतिक कार्यमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या प्रमुख उपस्थितीत लातूर येथील परिवहन विभागाच्या विविध प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठीची आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी झालेल्या बैठकीत आमदार देशमुख यांनी



बसस्थानकाचे बी.ओ.टी. तत्त्वावर बहुमजली पार्किंग व्यवस्थेसह त्वरित नूतनीकरण करण्यात यावे, ज्याला यापूर्वीच मंजुरी मिळाली आहे असे सांगीतले. तर एस.टी. डेपो स्थलांतर संदर्भात ते म्हणाले, लातूर शहराचा विस्तार झाल्याने छत्रपती शिवाजी महाराज चौकानजीक असलेला एस.टी. डेपो आता शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी आला आहे, ज्यामुळे वाहतुकीची मोठी कोंडी होते. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एस.टी. डेपो अंबाजोगाई रोडवरील वर्कशॉप नजीक स्थलांतरित करावा आणि त्याठिकाणी असलेले बसस्थानक क्र. २ छत्रपती शिवाजी महाराज चौकात स्थलांतरित करावे. लातूर येथील प्रादेशिक परिवहन कार्यालयाची इमारत जुनी झाली असून, तिच्या दुरुस्तीसाठी ७८ लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा. छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एस.टी. डेपोतून बसचालकांना बसस्थानकाबाहेर काढण्यासाठी मोठी कसरत करावी लागते. शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी हा भाग असल्याने वाहन पार्किंगची मोठी अडचण आहे. अंबाजोगाई रोडवरील बसस्थानक क्र. २ मध्ये फक्त अंबाजोगाईकडे जाणाऱ्या बस थांबतात, ज्यामुळे प्रवाशांना शहरात ये-जा करणे गैरसोयीचे ठरते आणि या बसस्थानकातून प्रवाशांचा प्रतिसाद कमी मिळतो.

अधिकाऱ्याकडून शेतकऱ्यांची अडवणूक: लातूर जिल्ह्यासह राज्यातील अनेक महामार्गांवर शेतमालाची वाहतूक करणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाहनांची अडवणूक करून परिवहन अधिकारी पैशाची मागणी करतात, अशा अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी अशीही मागणी यावेळी करुन लातूर जिल्ह्यात वाहनांना फिटनेस प्रमाणपत्र देण्यासाठी २ हजार रुपये एका वाहनाला द्यावे लागतात. पैसे दिले नाहीत तर परिवहन अधिकारी त्रुटी काढतात, हा एक प्रकारे लाच घेण्याचा प्रकार आहे. अशा अधिकाऱ्यांवर देखील कठोर कायदेशीर कारवाई करावी अशी मागणी केली. यावेळी सर्व मागण्यावर सवीस्तर चर्चा होवून या सर्व प्रश्नांची तातडीने सोडवणूक केली जाईल, अशी ग्वाही परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी दिली.

## पंचाहत्तरीची शाल अंगावर पडते तेव्हा.. ; मोहन भागवत यांचा रोख नेमका कोणाकडे?, चर्चांना उधाण

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे (आरएसएस) प्रमुख मोहन भागवत यांनी सध्या केलेल्या एका विधानाने सर्वांच्याच भुवया उंचावल्या आहेत. काल ते नागपूरमधील वनमती हॉलमध्ये एका कार्यक्रमात उपस्थित होते. यावेळी त्यांनी ,७५ वर्षांनंतर माणसाने इतरांना संधी दिली पाहिजे असे म्हटले आहे. नेमकं काय म्हणाले मोहन भागवत ? संघाचे वरिष्ठ कार्यकर्ते मोरोपंत पिंगळे यांच्या जीवनावर आधारित इंग्रजी पुस्तकाच्या प्रकाशन समारंभात सरसंघचालकांनी त्यांचे स्मरण केले.यावेळी बोलताना मोरोपंत पिंगळे एकदा म्हणाले होते की जेव्हा पंचाहात्तरीची शाल अंगावर पडते त्याचा



अर्थ आता थांबावं, तुमचं वय झालं आहे; बाजूला सरा, आम्हाला काम करु द्या ही आठवण मोहन भागवत यांनी आपल्या भाषणात सांगितली. त्यांच्या या विधानामुळे अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत. त्यांचा रोख नेमका कुणाकडे ? याची चर्चा आता रंगली आहे. मोरोपंत पिंगळे यांच्या भाकित्यांचा आणीबाणीनंतरच्या राजकीय संक्रमणादरम्यान पिंगळे यांच्या भाकितांचा संदर्भ देताना, आरएसएस प्रमुख म्हणाले की, जेव्हा निवडणुकांवर चर्चा झाली तेव्हा मोरोपंत म्हणाले होते की जर सर्व विरोधी पक्ष एकत्र आले तर ते सुमारे २७६ जागा जिंकतील आणि जेव्हा निकाल आले तेव्हा फक्त २७६ जागा जिंकल्या गेल्या.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

# संपादकीय

## जेन स्ट्रीटचा घोटाळा आणि सेबीची तत्परता

जेन स्ट्रीटचा घोटाळा सेबीने अत्यंत तपशिलाने तपासून एक नियामक संस्था म्हणून आपली गुणवत्ता सिद्ध केली. हे प्रकरण तंत्र व तंत्रज्ञ यांचा कुशलतेने वापर करत प्रचंड नफा कसा कमविला जातो, याचे प्रात्यक्षिक आहे. शेअर्समधील उलाढाल नियमबद्ध पद्धतीने करणे यापेक्षा नियमांना सोयीस्कर डावलून भरमसाट व अल्पावधीत पैसा कमविणे यालाच 'घोटाळा' म्हटले जाते.

हर्षद मेहता, केतन पारेख यांचे मोठे घोटाळे उघड झाले असले, तरी सातत्याने अशाप्रकारचे घोटाळे घडताना दिसत असतात. केवळ सापडले ते चोर एवढेच. 'पंप अँड डंप' म्हणजे मोठी खरेदी (स्वस्तात) आणि मोठी विक्री (अधिक दराने) करणे हेच सूत्र विविध घोटाळ्यांप्रमाणे जेन स्ट्रीटमध्ये दिसते. हा घोटाळा अधिक तंत्रकुशल व व्यापक असल्याने ही संस्था, तिची कार्यपद्धती, मिळवलेला फायदा व त्यावर सेबीने केलेली कारवाई हे एखाद्या गतिमान, नाट्यमय पटकथेचा भाग वाटते. या घोटाळ्यातून सर्वसाधारण व तथाकथित 'तज्ज्ञ' (स्मार्ट) गुंतवणूकदारांना मोठा धडा घेता येतो. जेन स्ट्रीट ही अमेरिकेतील व्यापार संस्था ४५ देशांतून आपल्या २ हजार ६०० कर्मचार्यांमार्फत विविध देशांच्या शेअर बाजारांत उलाढाल करते. भारततही ५० टक्के इतका मोठा वाटा तिचा वायदे बाजारात असून आपल्या धनशक्तीचा वापर बाजार दरात फेरफार करण्यास या संस्थेने वापरला.

जानेवारी २०२४ ते मार्च २०२५ या कालखंडात केलेल्या व्यवहारांतून सुमारे ३६,५०२ कोटी रुपयांचा नफा कमवला. यासाठी 'बाजीगर मॉडेल' वापरले. या खेळात 'हरलेल्या खेळातून जिंकणे' हा नावीन्यपूर्ण प्रकार केला. हे समजण्यास थोडे शेअर व्यवहार माहीत असणे आवश्यक आहे. शेअर्स दर वाढतील म्हणून घेणे व नंतर वाढल्यावर विकूण नफा कमवणे किंवा घसरतील म्हणून आता विकणे व नंतर खरेदी करून नुकसान टाळणे आणि नफा घेणे असे तेजीवाले आणि मंदीवाले कार्यरत असतात. रोखीचा व्यवहार करणारा आणि वायदा बाजार (एफ अँड ओ) असे व्यवहार गट आहेत. विशेषतः निप्टी या इंडेक्स फंडचा व त्यातील काही महत्त्वाच्या कंपन्या जसे एचडीएफसी, आयसीआयसीआय बँक यांच्या शेअर्सची मोठ्या प्रमाणात खरेदी-विक्री करून नफा कमविला जातो. त्यांची कार्यपद्धती आधुनिक अल्गो ट्रेडिंग वापरणारी; परंतु जुनी 'पंप व डंप' अशीच होती. विशेषतः वायदेबाजार निप्टीचा एक्सपायरी डेट वापरून हा फेरफार केला जात असे.

जेन स्ट्रीटची कार्यपद्धती समजून घेणे महत्त्वाचे आहे. दोन टप्प्यांत हा फेरफार खेळ रचला जातो. पहिल्या टप्प्यात सकाळच्या सत्रात निप्टीचे महत्त्वाचे शेअर्स व फ्युचर्स मोठ्या प्रमाणात खरेदी करावयाचे व त्यातून त्यांचे दर वाढवायचे. बाजारात तेजीचे वातावरण पाहून अनेकजण या लाटेत सहभागी होतात. आता दुपारी हे सर्व घेतलेले शेअर्स वेगाने विकायचे. यातून दर घसरतात. बाजार पडतो. हे सर्व करण्यात जेन स्ट्रीटला ७,६८७ कोटी रुपयांचा तोटा झाला; पण खरा खेळ पुढेच आहे. जेन स्ट्रीट सकाळच्या सत्रात वाढत्या किमतीच्या वातावरणात वाढलेला कॉल विकत व घसरलेला पूट खरेदी करत (कॉल व पूट हे वायदे बाजारातील व्यवहार प्रकार मोठ्या व्यवहारात वापरतात.) दुपारच्या सत्रात बाजार घसरल्याने कॉल घटतो व पूट वाढतो. नेमका हाच फायदा जेन स्ट्रीटने उचलत ४३,२८९ कोटी रुपयांचा फायदा मिळवला. यातील रोखीच्या गटात ७,६८७ कोटी रुपयांचा तोटा वजा जाता केवळ ३६,५०२ कोटी रुपयांचा नफा कमावला आणि हारी बाजी जितनेवाला जेन स्ट्रीट बाजीगर ठरला! या व्यवहारात भारतातील ९३ टक्के गुंतवणूकदारांनी आपले नुकसान करून घेतले. जेन स्ट्रीटचा हा व्यवहार फेरफार लक्षात आल्यानंतर फेब्रुवारी २०२५ मध्येच याबाबत एनएसईने सूचना दिली; परंतु जेन स्ट्रीटने हा खेळ सुरूच ठेवला. सेबीने १८ दिवसांच्या व्यवहारांचा तपशील अभ्यासून १०५ पानांचा अहवाल तयार केला आणि ४ जुलै २०२५ रोजी या संस्थेचे सर्व व्यवहार गोठवले.

# श्रध्दा व निष्ठा वृध्दिंगतासाठी वर्षावास !



चरथ भिक्खवे चारिकं, बहुजन हिताय, बहुजन सुखाय, लोकानुकम्पाय, अत्थाय हिताय देवमनुस्सानं । देसेथ भिक्खवे धम्मं, अदिकल्याणं मज्झकल्याणं, परियोसानकल्याण, सात्थ सब्यञ्जनं ब्रम्हचरियं पकासेथ।।

तथागतांनी धम्म प्रचार व प्रसारासाठी भिक्खूंना आदेश दिला. भिख्खूहो, बहुजनांच्या हितासाठी, सुखासाठी, लोकांवर अनुकंपा करण्यासाठी, मानवांना कल्याणकारी, धम्मपदेश करण्यात तुम्ही प्रवृत्त व्हा, प्रारंभी कल्याणपद, मध्यंतरी कल्याणपद आणि शेवटीही कल्याणपद अशा या धम्म मार्गाचा लोकांना उपदेश करा. वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास आषाढी पौर्णिमेपासून आश्विन पौर्णिमेपर्यंत, या तीन महिन्यात फक्त बुद्ध विहारात जीवन व्यतीत करणे. या काळात भिक्खूंनी धम्म-प्रचार-प्रसारासाठी स्वत:ला तयार करणे, बौध्द उपासक/उपासिकांना धम्माचं महत्व सांगणे, ध्यान-साधना करणे, धम्मदान स्विकारणे आदि नित्यक्रम करावे असा आदेश तथागतांनी भिक्षूसंघास दिला. त्याप्रमाणे ते आचरण करीत असत. यालाच वर्षावास म्हणण्याची प्रथा सुरु झाली, ती आजतागायत अविरत सुरु आहे यात खंड नाही. इथेच वर्षावासाचं महत्व सर्वश्रुत आहे. तथागतांनी बुद्धत्व प्राप्तीनंतर पंचवर्गीय संन्याशांना आपला अष्टांगिक मार्ग, प्रतीत्य समुत्पाद, चार आर्यसत्य हे समजावून दिल्यानंतर त्यांना ते कळले. इसिपतन वन (आधुनिक सारनाथ), वाराणसी येथे अनुत्तर असे पहिले धम्मचक्र प्रवर्तन केले. आश्विन पौर्णिमेला एकसष्ठ अर्हत भिक्षुंच्या समवेत धम्मचक्राची घोषणा केली. चारही दिशांना जाऊन बहुजन हिताय - बहुजन सुखाय धम्माची अशी सिंहगर्जना केली.

तथागत बुध्दांची पहिली धम्मसभा आषाढी पौर्णिमेला झाली. पुढे भिख्खूसंघाच्या निर्मीतीनंतर दरवर्षी याच कालावधीत उपासक वर्षावास करतात. याची सुरुवात आषाढी पौर्णिमेला होते आणि याच काळात पंढरीची वारी ही सुरु होते, हे निव्वळ योगायोग नाही. भगवान बुद्धाच्या काळात बुद्धांनी सर्व भिक्षूंना धम्माचा प्रसार करण्याचे आदेश दिले आणि सर्व बौद्ध भिख्खू या कामात गुंतले होते, परंतु असे केल्याने त्यांना बऱ्याच संकटांना आणि विशेषतः पावसाळ्यात नद्यांमध्ये अनेक संकटांना सामोरे जावे लागे. पुरामुळे बौद्ध भिख्खू वाहून जात आणि त्यांच्या चालण्याने शेतातील पिकांचे नुकसान होत त्यांनी हे तथागतांना सांगितले, बुद्धांनी आदेश दिला की आषाढ पौर्णिमेपासून ते अश्विनी पौर्णिमेपर्यंत सर्व भिक्षूंनी एकाच ठिकाणी रहावे, भिक्षेसाठी गावात जाऊ नये. एकाच ठिकाणी राहून धम्माचे पठण अध्ययन करावे. जर गरज पडली तर भिक्षू आपल्या गुरूंकडून जास्तीत जास्त एका आठवड्याचा वेळ घेऊन विहारातून बाहेर जाऊ शकतात, भगवान बुद्ध काळापासून वर्षावास अस्तित्वात आहे. तथागतांनी ४५ वर्षावास श्रावस्ती, जेतवन, वैशाली, राजगृह इत्यादी ठिकाणी केले. अशा प्राचीन गुरू-शिष्य परंपरेचे पालन आजही भारतात आणि बौद्धराष्ट्र थायलंड, म्यानमार, श्रीलंका, कंबोडिया आणि बांगलादेश पालन करतात.

आषाढ पौर्णिमेला वर्षावास सुरू होतो आणि अश्विन पौर्णिमेला संपन्न होतो, बौध्द धम्मात वर्षावासाला अनन्य साधारण महत्व आहे, सर्व बौध्द उपासक उपासिकांनी या तीन महिन्याच्या कालावधीत स्वःताच्या घरी रोज बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी लिहिलेल्या बुध्द आणि त्यांचा धम्म या पुस्तकाचे किंवा अन्य बुद्ध धम्माशी संबंधित पुस्तकाचे रोज सामुहिक वाचन करून त्यावर मनन चिंतन करावे व त्याचे आपल्या जिवनात अनुकरण केले पाहिजे, नियमितपणे शेजारच्या बुध्दविहारात जावून धम्म श्रवण करावा व धम्ममार्गावर आरूढ व्हावे, धम्मदान द्यावे, उपोसथ व्रत घेऊन अष्टशिलाचे पालन करून सदगुणाचा पाया मजबूत करावा, आपल्याप्रमाणे प्रत्येक कुटुंबास यानुसार आचरण करण्यास प्रोत्साहित केल्यास बौध्द उपासकांचा मोठा संघ तयार होईल व डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी पाहिलेल्या प्रबुध्द भारताचे दिव्य स्वप्न साकार होण्यास हातभार लागेल.

बुद्धांनी शिकवले की उपोसथ दिवस म्हणजे अशुद्ध मनाची शुद्धता करण्याचा दिवस होय, उपोसथ किंवा उपोस्थ या शब्दाचा अर्थ उप+स्था म्हणजे एकत्र बसणे होय, भिक्षुसंघाची एकसंघपणा टिकवून राहण्यासाठी उपोसथ विधी खूप महत्त्वाचा मानला गेला. उपोसथ विधी बुद्ध काळापासून अस्तित्वात आहे आणि बौद्ध देशांमध्ये उपोसथ विधी श्रद्धापूर्वक पाळला जातो. अमावस्या आणि पौर्णिमेच्या दिवशी भिख्खू पटिमोक्खा (आचारसंहितेचे नियम) यांचे पाक्षिक कबुलीजबाब आणि पाठ होते. या दिवशी बौद्ध उपासक आणि भन्ते धम्म अध्ययन आणि ध्यानाची तीव्रता आणखीन वाढवतात. विनयासंबधी जर आचारात काही दोष आला असेल तर उपोसथ दिनी भन्ते सर्वांसमोर कबुलीजबाब देत असत व संघ नियमानुसार त्यांना पुढील कारवाईस समोर जावे लागत. हा विधी खूप पवित्र मानला जाई, आजही त्याचे पालन केले जाते.

धम्माप्रती वचनबद्ध उपासक गृहस्थ पंचशील, दहा परिमिता, अष्टांगिक मार्गाचे पालन करतात धम्म आचरणात उत्साह जागृत होण्याकरिता समाधी मार्गाचे, ध्यानाचे अवलंबन करतात. जेव्हा शक्य असेल तेव्हा उपासक या दिवसाचा उपयोग स्थानिक विहारात जाण्याची संधी म्हणून करतात. या दिनी संघाला विशेष दान अर्पण केले जाते, धम्म प्रवचन ऐकले जाते आणि रात्री उशिरापर्यंत धम्म बांधवा सोबत ध्यान-धारणा केली जाते. जे उपासक विहारात जाऊ शकत नाहीत अशांना ही उपोसथ दिन संधी देतो कि, आपले ध्यान करण्याचे प्रयत्न वाढवावे कारण या पवित्र दिनी जगातील हजारो उपासक ध्यान धारणेचा अभ्यासात वुद्धी होण्याच्या दिशेने पाऊल टाकतात.

तथागत बुद्धांच्या आदेशानुसार भिक्खुसंघ धम्म प्रचारासाठी सर्व ऋतूत चारही दिशांना पायी फिरत असत, या तिन्ही ऋतुत त्यांना अनेक संकटांचा सामना करावा लागत असे, नैसर्गिक संकटांचा सामना करून प्रतिकूल परिस्थितीतही ते धम्माचा प्रचार-प्रसार करीत असत. हे सर्व लक्षात घेऊन तथागत बुद्धांनी भिख्खू संघाला आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा या कालावधीत, एकाच ठिकाणी विहारात राहून धम्माचा अधिक अभ्यास करीत आसपासच्या परिसरातील उपासकांना धम्मज्ञान देण्याबाबत सूचना दिल्या, आषाढ पौर्णिमा ते अश्विन पौर्णिमा हा काळ वर्षावास म्हणुन तेव्हापासुन संपन्न होऊ लागला (वर्षावास म्हणजे पावसाळ्यातील निवास) वर्षावास काळात श्रध्दावान उपासक विहारात जावून धम्म-श्रवण करतात, विहारात भिख्खूंना श्रध्दाभावनेने भोजनदान करतात व आजही सातत्याने सुरु असतात. फार महत्व आहे या पोर्णिमेचेआपण आपली संस्कृती जपली पाहिजे. आषाढ पौर्णिमेच्या अर्थात गुरु पौर्णिमेच्या सर्व उपासक/उपासिकांना मंगलमय शुभेच्छा!प्रविण बागडे

********

नागपूर भ्रमणध्वनी :
९९२३६२०९१९

# ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन

सावधान!लोकसंख्या अशीच वाढत राहिली तर निसर्गाचा ह्यास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास सर्वांनाच भोगावा लागेल.

लोकसंख्या अशीच वाढत राहाली तर निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रासजगातील प्रत्येक व्यक्तीला,संपूर्ण जीवजंतूला व वन्य प्राण्यांना भोगावाच लागेल.वाढत्या लोकसंख्येचा धोका पहाता जागतिक स्तरावर लोकसंख्या वाढीवर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. लोकसंख्या वाढ ही जगातील प्रत्येक देशाच्या विकासामध्ये व्यत्यय निर्माण करीत असते. त्यामुळे लोकसंख्या नियंत्रणाच्या उद्देशाने ११ जुलै १९८७ ला जागतिक लोकसंख्येचा विचार केला तर ५०० कोटी लोकसंख्या असल्याचे लक्षात आले.ही बातमी जगभर पसरली.त्या उद्देशाने लोकसंख्या नियंत्रणासाठी वेगवेगळे कार्यक्रम राबविण्यात येवु लागले.संयुक्त राष्ट्रसंघाच्या विकासविषयक कार्यक्रमाच्या (युएनडीपी)गव्हर्निंग कौन्सिलने ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन जगभर साजरा केला जावा अशी शिफारस केली.या शिफारशी नुसार ११ जुलै १९८९ पासून ११ जुलै हा दिवसजागतिक लोकसंख्या दिन म्हणून साजरा केला जातो. जगाची लोकसंख्या १९८७ ला ५०० कोटी होती.यानंतर २०१९ मध्ये ७७० कोटींवर पोचली. यात सर्वाधिक लोकसंख्या आशिया खंडात ४४६.२७ कोटी असल्याचे दिसून आले.यानंतर आफ्रिका, युरोप,उत्तर अमेरिका, दक्षिण अमेरिका, ऑस्ट्रेलिया व अंटार्टिका अशा पध्दतीने या खंडात लोकसंख्येचा क्रमवार होता.भारताचा विचार केला तर १९५१ साली फक्त ३६ कोटी लोकसंख्या होती.ती आजच्या घडीला १४० कोटीच्यावर गेली आहे.हा भारतासाठी चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.२०१४ च्या आकडेवारी नुसार सर्वाधिक लोकसंख्या असनारे देश याप्रमाणे प्रथम चीन,भारत, अमेरिका, इंडोनेशिया, पाकिस्तान,ब्राझील,नायजेरिया,बांगलादेश,रशिया व जापान ४३८ कोटी लोक या दहा देशात रहातात.हा आकडा जागतिक लोकसंख्येच्या ५७ टक्के इतका आहे ही अत्यंत गंभीर बाब आहे.आज संपूर्ण जगात लोकसंख्या वाढीचा विचार केला तर भारताच्या भुभागाच्या तुलनेत लोकसंख्येच्या बाबतीत भारत प्रथम क्रमांकावर आहे आणि चीनच्या भुभागाच्या तुलनेत चीन लोकसंख्येच्या बाबतीत दुसऱ्या क्रमांकावर आहे.आज भारताची लोकसंख्या १४० कोटींच्या घरात आहे हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.भारतातील लोकसंख्या नियंत्रणासाठी प्रत्येक राज्यांनी पुढाकार घ्यायला पाहिजे व मुख्यत्वेकरून सर्वच मुख्यमंत्र्यांनी याकडे जातीने लक्ष घालायला हवे.त्याचबरोबर पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष व पक्ष-विपक्षांनी लोकसंख्या नियंत्रणासाठी पुढाकार घ्यायला हवा.वाढती लोकसंख्या संपूर्ण देशालाच नाही तर संपूर्ण जगाला घातक ठरत आहे.वाढत्या लोकसंख्येमुळे अनेक देशांना कठोर परीस्थितीशी सामना करावा लागत आहे.यामुळे बेरोजगारी,भुकमरी, महागाई, शेतकऱ्यांच्या आत्महत्यां, महागडे शिक्षण, उपासमार, कुपोषण, पाणी टंचाई, इंधन,आरोग्य विषयक सुविधांचा अभाव,औषधांची समस्या, मुलभूत सुविधांचा अभाव इत्यादींचा सामना आज सर्वांनाच करावा लागत आहे.वाढती लोकसंख्या प्रत्येक देशाला विकासापासून वंचित करण्याचे कार्य करीत असते याकरिता प्रत्येक देशाचे दायीत्व बनते की लोकसंख्या नियंत्रण काळाची गरज आहे. वाढत्या लोकसंख्येमुळे देशाचा विकास खुंटतो व देश डबघाईस येतो. देशाची वाढती लोकसंख्या लक्षात घेता शहरीकरणाचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.त्याचप्रमाणे औद्योगिकीकरण व उद्योग धंदे मोठ्या प्रमाणात वाढल्यामुळे लोकांच्या रहाण्याच्या व्यवस्थेकरीता मोठ्या प्रमाणात जंगल संपत्तीचा विनाश होत आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीमुळे जंगलसंपदा संपुष्टात येत आहे. त्यामुळे आज जंगलातील हिंसक प्राणी शहरांकडे धाव घेतांना दिसतात.भारतातील वाढती लोकसंख्या लक्षात घेता यावर नियंत्रण आणण्याची नितांत गरज आहे. वाढत्या लोकसंख्येचे विक्राळ रूप पहाता आता भारत सरकारने एक परीवार एकच अपत्य असा कायदा सर्वांसाठी अमलात आणावा मग तो व्यक्ती कोणत्याही धर्माचा असो.यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवता येईल व देशाचा विकास होईल.अन्यथा भारतात अशीच लोकसंख्या वाढत राहाली तर मानुस मानसाला मारल्या शिवाय रहाणार नाही. कारण वाढत्या लोकसंख्येमुळे देशाच्या विकासासाठी अनेक अडथळे निर्माण होतांना दिसतात. भारतात लोकसंख्या इतकी झपाट्याने वाढली आहे की अनेक लोक फुटपाथवर झोपतांना दिसतात, नदीच्या काठावर घरे, रेल्वे रूळाच्या जवळ घरे, तलावाच्या काठावर घरे अशा दुर्घटना स्थळी मोठ्या प्रमाणात झोपड्या पहायला मिळतात हा संपूर्ण प्रकार लोकसंख्या वाढीचा आहे.आज जगाला लोकसंख्या वाढी पेक्षा वृक्ष वाढवीण्याची नितांत गरज आहे.कारण वृक्ष तोडीमुळे सुर्य आग ओकत आहे.आज पृथ्वी लोकसंख्या वाढीच्या भाराखाली दिवसेंदिवस दबत आहे. त्यामुळे आज लोकसंख्या वाढीपेक्षा निसर्ग वाढीवर भारतासह संपूर्ण जगाने जास्त भर दिला पाहिजे. निसर्गाचा ह्रास आणि लोकसंख्या वाढीचा त्रास दिवसेंदिवस संपूर्ण जगाला होत आहे.याला कोठेतरी रोखले पाहिजे.मानवाने स्वत:च्या स्वार्थासाठी सुखसमाधानासाठी लोकसंख्या वाढवीली आहे. त्यामुळे आज हिंसक प्राणी मानवावर आक्रमण करताना दिसतात यामुळे मनुष्य व प्राणी यांच्यात वैरत्व निर्माण झाले आहे.ही परीस्थिती मानवाने स्वत:हुन ओढावली आहे. मानवाच्या अतीरेकामुळे आज पृथ्वीचे संतुलन डगमगतांना दीसत आहे.त्याचबरोबर समुद्राची पातळी दरवर्षी सरासरी ३.५ मिलिमीटरने वाढत आहेच सोबतच पाण्याचे उष्णतामान सुध्दा वाढत आहे.म्हणजेच दिवसेंदिवस पृथ्वीचा भुभाग धोकादायक स्थितीमध्ये मानवाने आणल्याचे दिसून येते.कोव्हिड-१९ महामारी ही सुध्दा मानवाच्या अतीरेकाचे कारण आहे.चीनमध्ये एवढी लोकसंख्या वाढली आहे की तेथील लोक समुद्र किनाऱ्यावर रहातात.त्यामुळे चीन विस्तारवादाचे घृनीत कृत्य करतांना दिसतो. हा संपूर्ण प्रकार चीनच्या वाढत्या लोकसंख्येमुळे उद्भवलेला आहे. चीनच्या विस्तारवादाच्या भुमिकेमुळे जगातील अनेक देश चीनच्या विरोधात गेले आहे. म्हणजेच लोकसंख्या वाढीचा एवढा घातक परिणाम होत आहे की मानव एक-मेकावर बंदुक ताणुन बारूदच्या ढीगाऱ्यावर बसला आहे.यावरून स्पष्ट होते की लोकसंख्या वाढीमुळे जग भुईसपाट व्हायला काहीच वेळ लागणार नाही.त्यामुळे लोकसंख्येवर नियंत्रण ठेवणे प्रत्येक देशाचे प्रथम कर्तव्य असायला पाहिजे असे मी समजतो. आज लोकसंख्या वाढीमुळे भारताच्या दरडोई उत्पन्नात मोठ्या प्रमाणात घट झाली आहे.वाढती लोकसंख्या पहाता अनेक व्यापारीवर्ग भेसळयुक्त पदार्थ,कार्बाइडने पिकवीलेली विषारीयुक्त फळे, भेसळयुक्त दूध इत्यादी अनेक विषारी वस्तुचा वापर लोकांना करावा लागतो.यामुळे घातक आजार सुध्दा होवु शकतात आणि होत आहे.यामागचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.अनेक कारणांवरून असे दिसून येते की वाढत्या लोकसंख्येमुळे भारतासह अनेक देशांमध्ये विक्राळ रूप धारण केले आहे.याला रोखण्यासाठी कठोर पावले उचलन्याची नितांत गरज आहे.जगात व देशात वाढत्या प्रदूषणाला जबाबदार वाढती लोकसंख्याच आहे. लोकांच्या सुखसुविधांकरीता विमान वाहातुक,रोड वाहातुक,रेल्वे वाहतूक व इतर वाहतूक इत्यादी मोठ्या प्रमाणात वाहने धावतांना दीसतात यामुळे प्रदूषण मोठ्या प्रमाणात वाढत आहे.याचा परीनाम असा होत आहे की अनेक आजारांना खुले आमंत्रण दिल्या जात आहे.त्यामुळे ११ जुलै जागतिक लोकसंख्या दिन लक्षात घेता देशातील सर्व राज्यांनी व केंद्र सरकारनी वाढती लोकसंख्या नियंत्रणासाठी युध्दपातळीवर प्रयत्न केले पाहिजेत.काही राजकीय पक्ष आपला धर्म धोक्यात आहे, आपल्या धर्माची लोकसंख्या कमी होत आहे असे सांगून धर्माचे काही ठेकेदार लोकसंख्या वाढवीण्याचा सल्ला देतात. अशांवर राज्य व केंद्र सरकारने ताबडतोब कठोर कारवाई केली पाहिजे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे.त्यामुळे मानवाने संपूर्ण सीमारेषांचे उल्लंघन केल्याचे दिसून येते.मानवाच्या बुध्दीजीपनामुळे आज निसर्गाच्या सान्निध्यात रहाणाऱ्या पशु-पक्षांचे जगने अत्यंत कठीण झाले आहे.याचे मुख्य कारण म्हणजे वाढती लोकसंख्या होय.भारताने लोकसंख्येवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर पुढेचालुन अनेक कठीणायीचा सामना करावा लागेल हेही तेवढेच सत्य आहे. त्याचप्रमाणे लोकसंख्या अशीच झपाट्याने वाढत रहाली तर कोणतेही सरकार लोकांच्या अपेक्षा पूर्ण करू शकणार नाही.त्यामुळे आताच सावधगिरीचे उपाय योजले पाहिजेत व लोकसंख्येवर नियंत्रण आनले पाहिजे.लोकसंख्यावाढीमुळे भारतासह जगात केव्हाही महाप्रलय येवु शकतो हे सरकारने व जनतेने लक्षात ठेवले पाहिजे.जगातील लोकसंख्या अशाच वेगवान गतीने वाढत रहाली तर मानवाच्या उष्णतेमुळे आणि अतीरेकामुळे शिखरातील बर्फ आपोआप वितळायला सुरूवात होईल व समुद्राची पातळी आपोआप वाढत जाईल याला नाकारता येत नाही.त्यामुळे लोकसंख्येच्या बाबतीत सावधान होने गरजेचे आहे.केंद्र सरकार, राज्य सरकार व पक्ष-विपक्षाचे राजकीय पुढारी यांना आग्रह करतो की लोकसंख्या नियंत्रणासाठी सर्वोतोपरी कठोर पाऊल उचलण्यासाठी एकत्र येण्याची गरज आहे. जागतिक लोकसंख्या दिनाचे औचित्य साधून जगातील प्रत्येक देशांनी आजच्या घडीला वृक्षारोपण करून करोडो झाडे लावण्याचा संकल्प करावा.

*******

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९, नागपूर.

# चांगले मार्गदर्शन,प्रेरणा व संस्कार देणारा प्रत्येक व्यक्ती आपला गुरू

प्राचीन काळापासून गुरूच्या स्मरणार्थ आषाढ महिन्यातील पौर्णिमासाजरी करण्याची परंपरा गेल्या ५ हजार वर्षांपूर्वीची आहे. त्यामुळेच भारतात गुरूपौर्णिमेला आगळेवेगळे महत्व असल्याचे आपल्याला दिसुन येते.गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने सर्वांनीच गुरू या शब्दाचा मान-सन्मान करने अत्यंत गरजेचे आहे.कारण गुरू शिवाय ज्ञान नाहीही म्हण सत्य आहे.गुरू पौर्णिमेचे महत्व जाणून चांगले विचार आचरणात आणायला हवे. गुरूचे महत्व म्हणजे ज्यांच्यापासुन आपल्याला चांगल्याप्रकारची चालना,गुण, शिक्षण, प्रशिक्षण, मार्गदर्शन, प्रेम,आपुलकी, प्रेरणा, संस्कार जिव्हाळ्याच्या गोष्टी इत्यादींचे जो व्यक्ती चांगले आणि महत्त्वपूर्ण मार्गदर्शन करतो तोच आपला खरा गुरु समजायला पाहिजे.आई-वडिल हे गुरू या परीभाषेपेक्षाही महान आणि मोठे आहेत.जो पर्यंत सुर्य-चंद्र-आकाश-पाताळ आहे तोपर्यंत आई-वडीलांचा मान गुरू पेक्षाही महान आहे आणि राहील यात दुमत नाही.कारण आई-वडीलां समोर सर्वच नतमस्तक होतात आणि व्हायला हवे.ज्याप्रमाणे संपूर्ण सृष्टी पृथ्वी मातेसमोर नतमस्तक होते.आई मायेचे पांघरूण घालुन मुला-मुलींना लहानाचे मोठे करते तर वडील संपूर्ण कुटुंबाची ढाल बनून कुटुंबाचे रक्षण करण्याचे काम करीत असतो. त्यामुळे आपण नेहमी पहातो की छोटी दुर्घटना घटना घडली तर आपण आईग म्हणुन आईला हाक मारतो यावेळी आईच्या रूपात सर्वच धावुन येतात.यामुळे आपले दु:ख कमी होते.त्याच्या विपरीत जर मोठी घटना घडली तर आपण बापरे म्हणतो.यावेळेस संपूर्ण गाव जमा होवुन वडिलांच्या रूपात धावुन येतो.अशाप्रकारे आई-वडीलांचे नाते किती महान व अनभिज्ञ आहे जगात दिसून येते. म्हणजेच या जगात जो आपले पालन-पोषन करतो तो आपला सर्वात मोठा गुरू आहे. वडिलांचे नाते किती महान आहे हे आपण समजू शकतो. त्याचप्रमाणे आपण नेहमी पहातो की आई-वडीलांचा अपमान कोनीही सहन करीत नाही आणि करणार नाही.अशा परिस्थितीत मुलं-मुली तुटून पडतात.यात खरे गुरु-शिष्याचे नाते दिसून येते. म्हणजेच जगाच्या पाठीवर सर्वात मोठे गुरू-शिष्याचे नाते म्हणजे आई-वडिलच. यात मोठा वाटा म्हणजे आई-वडीलांचे मुलांवरील संस्कार व मार्गदर्शन.यातुनच गुरू-शिष्याचा जन्म झाला.आई गुरूची भुमिका बजावुन वटवृक्षाच्या अफाट सावलीत मुलांची जोपासना करते तर वडील याच वटवृक्षाचा पहारेकरी बनुन परिवाराचे जतन व संरक्षण करते.मानसाच्या आयुष्यात अनेक उतारा-चढाव येतात, कठीण समस्या येतात, सुख-दु:खाच्या घटना घडतात. याकरीता वेगवेगळ्या मार्गदर्शनासाठी प्रत्येकाला गुरूची आवश्यकता असते. कारण गुरू शिवाय संपूर्ण मार्ग अधुरा असतो.आपण शिक्षणाच्या क्षेत्रात जेव्हा पाय ठेवतो.तेव्हा शिक्षक आपला गुरुच असतो. कारण पुढील आयुष्याचे खरे मार्गदर्शन आपल्याला शिक्षकांपासुन मिळत असते. आपण शाळेतल्या पहिल्या पायरीपासुन तर शेवटच्या पायरीपर्यंत म्हणजे अंतीम शिक्षणापर्यंत शिक्षक आपला गुरूच असतो.कारण यांच्या पासुनच आपल्या बुध्दीमत्तेचा आणि पुढील वाटचालीचा मार्ग मोकळा होतो व आपल्याला पुढील दिशा आणि मार्ग दिसून येतात.त्याचप्रमाणे क्रीडाक्षेत्रात पदार्पण करतांना गुरूची अत्यंत आवश्यकता असते.कारण संपूर्ण क्रीडाक्षेत्राचे भवितव्य आपल्या गुरू विद्येवर अवलंबून असते.त्यामुळे आपण क्रीडाक्षेत्रात नेहमी पहातो की कुशलता, कर्तबगारी, उत्कृष्ट खेळाडू आणि पराक्रमी खेळाडू तयार करतांना गुरू-शिष्याची संपूर्ण कसोटी लावून आपली ताकद झोकल्या जाते. तेव्हाच पीटी उषा, कपिल देव, तेंडुलकर, दारासिंग,खली, मिल्खासिंग, मेजर ध्यानचंद,निरज चोपडा असे अनेक नामांकित व महान खेळाडू गुरूमुळेच तयार झाले आणि होतात सुध्दा. गुरूच्या परीक्षेत जो-जो पास होतो.तीच शिष्यांकडून गुरू दक्षिणा असते.आपण महाभारत ते रामायणमध्ये गुरू-शिष्याचे काय नाते असते ते आपण जाणतोच. व्दापरयुग,सत्ययुग,कलयुग किंवा कोणतेही युग असो गुरू शिवाय पुढचा मार्ग निघने अवघड असते.याकरीता गुरूची आवश्यकता असने गरजेचे असते.राजकीय क्षेत्राचा विचार केला तर यातही आपल्याला गुरू-शिष्याचे नाते दिसून येते.यातुन राजकीय पुढारी तयार होतात.आपण पारतंत्र्यात असतांना स्वतंत्र लढा जिंकण्यासाठी क्रांतीकारकांनी आपल्या गुरूंच्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्र्याचा लढा उभा केला.त्यामुळेच आज आपण स्वतंत्र भारतात राहून मोकळा स्वास घेवु शकतो. कारण क्रांतीकारकांना गुरूचे मार्गदर्शन योग्य लाभले त्यामुळेच क्रांतिकारक शिष्यांनी भारताला स्वतंत्र मिळवून दिले.त्यामुळे गुरू शिवाय कोणतेही काम होने शक्य नाही. याकरीता कोणतेही क्षेत्र असो अनुभव,ज्ञान,माहीती मिळवण्यासाठी गुरूची तेवढीच आवश्यकता असते.म्हणुनच म्हटल्या जाते गुरू बिना ज्ञाण अधुरा. त्याचप्रमाणे आपण पुजाअर्चना करतो याचे मुख्य कारण म्हणजे एकाग्रता निर्माण व्हावी.आपण आपले काम फत्ते व्हावे याकरिता देवी-देवता व पुर्वजांची पुजाअर्चना करतो.कारण आपण केलेल्या कार्याला यश प्राप्त झाले पाहिजे.भारत भुमित गौतम बुद्ध, ऋषीमुनी, त्यागी, साधुसंत,थोरमहात्मे होवुन गेले.याच्याच पाऊलावर पाऊल ठेवून योगा व व्यायामाच्या मदतीने आपले शरीर सुदृढ आणि निरोगी ठेवण्यासाठी प्रयत्नशील असतो.त्यामुळे आज भारताला योगाच्या बाबतीत विश्र्व गुरू म्हणुन संबोधल्या जाते. त्याचप्रमाणे भारताला विश्र्व शांतीचा गुरू सुध्दा संबोधल्या जाते.कारण जगाच्या पाठीवर शांतीपूर्ण देश म्हणजे भारताची जगात प्रचीती आहे.म्हणजेच आज भारत विश्र्व शांतीचा गुरू असल्याचे दिसून येते.ह्या संपूर्ण घटनांचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, परंपरा, संपूर्ण धर्माची जोपासना यामुळेच भारताला विश्र्व गुरू म्हणून संबोधल्या जाते.गुरू पोर्णिमेच्या निमित्ताने हेच सांगु इच्छितो की मुलांनी आई-वडीलांच्या सेवेला,त्यांच्या आज्ञेला व त्यांनी सांगितलेल्या कामाला प्रथम प्राधान्य देवून गुरू-शिष्याच्या नात्याची जोपासना सर्वांनीच केली पाहिजे.आताही भारतात गुरू शिष्याचे नाते अतूट आहे व टिकुन आहे याचे मुख्य कारण म्हणजे भारतीय संस्कृती, भारतातील अनेक धर्म,जाती-पंथ यांचा एकत्रित पणा यामुळेच आपल्याला गुरु-शिष्याचे नाते अधिक घनिष्ठ असल्याचे दिसून येते.शिष्यांनी एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की ज्यांच्या पासून आपण प्रेरणा घेतो,त्याची अवहेलना कुठेही होणार नाही याची काळजी सर्वांनीच घेतली पाहिजे.यातच शिष्यांची महानता दिसून येईल.गुरू पौर्णिमेबद्दल एक गोष्ट सांगु इच्छितो की,परीवारापेक्षा श्रेष्ठ कोणीही नाही, वडिलांपेक्षा श्रेष्ठ सल्लागार नाही,आई पेक्षा श्रेष्ठ जग नाही,भावापेक्षा श्रेष्ठ भागीदार नाही,बहीनी पेक्षा श्रेष्ठ शुभचिंतक नाही,मित्राशिवाय आयुष्य नाही यात आपल्याला गुरूचा गोडवा कीती महान आहे ते आपल्याला स्पष्ट दिसून येते.म्हणजेच प्रत्येक परीवार गुरूची भुमिका आप-आपल्या परीने पार पाडत असते. त्याचप्रमाणे सर्वांनीच एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे की गुरू-शिष्याच्या नात्याला कोणीही कलंकित करणार नाही याचीही काळजी सर्वांनीच घेणे गरजेचे आहे. कारण गुरू-शिष्याच्या नात्यानेच आपण घडतो आणि घडवितो, आपला परिवार घडते व यातुनच देश घडतो.आई माझा गुरु,आई कल्पतरू, सुखाचा सागरू,आई माझी प्रीतीचे माहेर, शांतीचे आगार, मांगल्याचे सार आई माझी. गुरू पौर्णिमेच्या निमित्ताने मी सर्वांना विनंती करतो की देशातील वाढते प्रदुषण,ऑक्सिजनचे कमी होत असलेले प्रमाण आणि ग्लोबल वॉर्मिंगमुळे वाढणारा धोका रोखण्यासाठी प्रत्येकांनी आपल्या परिसरात किंवा घरी वृक्षारोपण केले पाहिजे.ज्याच्या परिसरात जागा नसेल त्यांनी एखाद्या कुंडीमध्ये झाड लावुन वृक्षारोपण करायला हवे.कारण वाढते प्रदुषण मानव, जिवजंतू, वन्यप्राणी यांच्यासाठी अत्यंत धोकादायक स्थितीत आहे.त्यामुळे गुरू पोर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपणावर भर दिला पाहिजे व पृथ्वी मातेचे रक्षण केले पाहिजे.गुरूपौर्णिमेच्या हार्दिक शुभेच्छा!

**********

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार.
( स्वतंत्र पत्रकार )
मो.नं.९९२१६९०७७९,नागपूर.

# आषाढ पौर्णिमा अर्थात गुरू पौर्णिमा

मात्र या पौर्णिमेला गुरु पौर्णिमा कधी पासून म्हणायला सुरुवात झाली हे आपण लक्षात घेतले पाहिजे. बौद्ध धम्मात याच पौर्णिमेपासून वर्षावास प्रारंभ होतो. याच दिवशी बुद्धांनी सर्वात पहिले धम्मचक्रप्रवर्तन केले. त्याचा इतिहास आपण जाणून घेऊ यात ..

पहिले धम्मचक्रप्रवर्तन, पहिला वर्षावास – सारनाथ , उरुवेला (बुद्धगया) वरून इसीपतन मिगदाव वनात जाताना बुद्धांनी गयाचा मार्ग घेतला. वाटेत त्यांना एक आजीवक भेटला व त्याच्याशी वार्तालाप करताना बुद्ध त्याला म्हणाले मी जीन आहे. बुद्ध आहे कारण मी सर्व अस्रवांचा, सर्व पाप धर्माचा नाश केला आहे. ललितविस्तार या ग्रंथात नमूद केल्या प्रमाणे गया येथील सुदर्शन नागराज याच्या निवास्थानी मुक्काम व भोजन घेतले. त्यानंतर चारिका आणि पिण्डपात करत इसीपतन मिगदाव वनात पोहचले. तेथे त्यांची भेट त्यांना आधी सोडून गेलेल्या ५ परिव्राजकांशी झाली. इथेच सम्राट अशोकांनी स्तंभ उभारला ज्याचे शीर्षस्थानी त्याची चार सिंह असलेले शिल्प आहे. दुसऱ्या दिवशी आषाढ पौर्णिमा होती आणि त्या दिवशी बुद्धांनी धम्मचक्कापवत्तनसुत्त चा उपदेश दिला. पहिल्यांदाच बुद्ध धम्म संघ सरणं गच्छामिचे स्वर वातावरणात उमटले. भ. बुद्धांचा हा प्रथम वर्षावास होता. त्यानंतर पाच दिवसांनी बुद्धांनी अनत्तलक्खण सुत्तचा उपदेश दिला. पाचही भिक्खू स्रोतापन्न अवस्थेत पोहचले आणि पाचच दिवसात अर्हत देखील झाले. ही प्रक्रिया इतकी सोपी नव्हती, मात्र या पाचही भिक्खुंनी त्या आधी अनेक वर्षे प्रचंड परिश्रम घेतले होते. त्यामुळे त्यांची मनाची तपोभूमी तयार झाली होती. बुद्धांची देशना ऐकून वाराणसीच्या श्रेष्ठीचा पुत्र यश प्रचंड प्रभावित झाला होता. त्याच्या बरोबर त्याच्या अनेक मित्रांनी परिव्रज्या घेतली. थोड्याच दिवसात यश आणि त्याच्या मित्रांनी स्रोतापन्न अवस्था गाठली आणि काही काळानंतर तेही अर्हत झाले. अतिशय श्रद्धापूर्वक, मनाची एकाग्रता न ढळू देता, बुद्धांनी सांगितलेल्या प्रत्येक उपदेश आणि विचारांचे ते पालन करत होते आणि त्यामुळेच ते थोड्या अवधीत अर्हत झाले. या पहिल्या वर्षावासात भ.बुद्धांच्या व्यतिरिक्त पृथ्वीवर त्यावेळेस ६० अर्हत झाले होते . त्यानंतरच्या अश्विन पौर्णिमेला या सर्व भिक्खूंना बुद्धांनी वेगवेगळ्या दिशेला धम्म प्रचारासाठी पाठवून दिले व स्वतः सेनानिगाम कडे जायला निघाले. या दोन पौर्णिमेच्या मधला काळ हा वर्षावास असतो . वाराणसीच्या पुढे जाताना बुद्ध कप्पासिय वनखण्ड येथे पोहचले व तेथील ३० लोकांना प्रवज्या दिली. नंतर ते उरुवेला येथे पोहचले. त्याकाळी उरुवेलात तीन हट्टयोगी / जटिल साधू बंधू राहत होते. प्रत्येकाचा स्वतःचा मोठा शिष्यवर्ग होता. उरुवेला कश्यप, नदी कश्यप आणि गया कश्यप अशा या तिन्ही बंधूंनी बुद्धांचा मार्ग योग्य वाटल्याने परिव्राजित होऊन बुद्धधम्म संघात सामील झाले. बुद्धांचा हा संघ मग गया येथील गयासिस पर्वतावर गेला. (आत्ताचा ब्रह्मयोनी पर्वत ज्यावर १८०० मध्ये बाळाजी पंडित या मराठा सरदाराने मंदिर बांधले आणि १८४३ मध्ये राव साहेब सिंदिया यांनी पायथ्यापासून वर पर्यंत पायऱ्या बसवल्या.) याच पर्वतावर भ.बुद्ध यांनी आदित्त परियाय सुत्त ची देशना दिली. त्यानंतर सर्व संघाला घेऊन बुद्ध पौष महिन्यातील पौर्णिमेच्या दिवशी राजगृहाला पोहचले. तेथे मगधराज बिम्बिसार त्यांना भेटायला आला. दुसऱ्या दिवशी भोजनानंतर बिम्बिसाराने भिक्खूसंघाला वेळूवन दान दिले. लिच्छवींच्या आग्रहाखातर बुद्ध वैशाली नगरीत गेले, मात्र त्यावेळेस तेथे भयंकर महामारीचा रोग पसरला होता. बुद्धांनी तेथे 'रतनसुत्त' चा उपदेश दिला व नगरवासियांचे सांत्वन केले. नंतर पुन्हा राजगृहाला येऊन दोन महिने वेळुवनात थांबले. धम्मचक्कप्पवत्तन सुत्तं ला त्रिपिटक मध्ये कुठे नमूद केले आहे ते पाहुयात –

त्रिपिटक : सुत्त, अभिधम्म, विनय

सुत्त पिटक मध्ये ५ निकाय आहेत : दीघ निकाय, मज्झिम निकाय, संयुत्त निकाय, अङगत्तुर निकाय, खुद्दक निकाय

संयुत्त निकाय मध्ये ५ वग्गपाळि आहेत: सगाथवग्गपाळि निदानवग्गपाळि, खन्धवग्गपाळि, सळायतनवग्गपाळि, महावग्गपाळि

महावग्गपाळि मध्ये १२ संयुत्तं आहेत : मग्गसंयुत्तं, बोज्झङगसंयुत्तं, सतिपट्ठान सं, इन्द्रिय सं, सम्मप्पधान सं, बल सं, इध्दिपाद सं, अनुरुध्द सं, झान सं, आनापान सं, सोतापत्ति सं, सच्च सं

सच्चसंयुत्तं मध्ये ११ वग्गो आहेत : समाधि वग्गो, धम्मचक्कप्पवत्तन व, कोटिगाम व, सीसपावन व, पपात व, अभिसमय व, पठमआमकधञ्ञपेय्याल व, दुतियआमकधञ्ञपेय्याल व, ततियआमकधञ्ञपेय्याल व, चतुत्थआमकधञ्ञपेय्याल व, पञ्चगतिपेय्याल व,

धम्मचक्कप्पवत्तन वग्गो मध्ये १० सुत्त आहेत. त्यातील पाहिले सुत्त आहे धम्मचक्कप्पवत्तन सुत्तं

याच धम्मचक्कप्पवत्तन सुत्तंची देशना भ. बुद्धांनी पंचवर्गीय भिक्खुंना आषाढ पौर्णिमेच्या दिवशी दिला. म्हणून या पौर्णिमेच्या दिवसाला धम्मचक्कप्पवत्तन दिन म्हणतात आणि या पौर्णिमेला विश्वातील या महागुरूंनी दिलेल्या देशनेमुळे गुरू पौर्णिमा म्हटले जाते. आपल्या सर्वांना धम्मचक्कप्पवत्तन दिन तथा गुरूपौर्णिमेच्या खूप सदिच्छा. म्हणूनच या दिवशी आपल्याला मार्ग दाखविणाऱ्या गुरुजनांना आदर दाखवायला सुरुवात झाली.

*********

अतुल भोसेकर
९५४५२७७४१०

## लघवीत येतोय फेस आणि बुडबुडे; वेळीच व्हा सावध! 'या' गंभीर आजाराचे असू शकते लक्षण

लघवीमध्ये फेस येणे ही एक सामान्य समस्या असू शकते. लघवी करताना बुडबुडे तयार होणे मात्र अजिबात सामान्य नाही. बहुतेक लोक लघवी करताना बुडबुड्यांच्या समस्येकडे दुर्लक्ष करतात. परंतु लघवीमध्ये वारंवार बुडबुडे येणे हे एखाद्या मोठ्या आजाराचे लक्षण असू शकते.

लघवीमध्ये बुडबुडे येणे हे किडनीच्या जळजळीचे किंवा किडनीशी संबंधित समस्येचे मोठे लक्षण असू शकते. जेव्हा किडनी व्यवस्थित काम करत नाही तेव्हा लघवीमध्ये प्रथिने दिसतात, वैद्यकीय भाषेत त्याला प्रोटीन्युरिया म्हणतात. जर तुमच्या लघवीमध्ये बुडबुडे असतील तर त्याकडे दुर्लक्ष करू नका, शक्य तितक्या लवकर डॉक्टरकडे जा. नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हेल्थने केलेल्या अभ्यासानुसार आपण याबाबत अधिक माहिती घेऊया

डायबिटीस

लघवीमध्ये बुडबुडे येणे हे शरीरातील साखरेचे प्रमाण वाढल्याचे लक्षण असू शकते. कधीकधी लघवीमध्ये बुडबुडे येणे हे सामान्य असू शकते. परंतु दररोज लघवीमध्ये बुडबुडे येणे सामान्य नसते. जर लघवीमध्ये बुडबुड्यांची समस्या बराच काळ असेल तर त्याकडे दुर्लक्ष करू नका, ते डायबिटीसचे लक्षण असू शकते. अशा परिस्थितीत, शक्य तितक्या लवकर डॉक्टरकडे जा आणि योग्य तपासणी करून त्यावर उपाय चालू करा

प्रोटीन्युरिया

जर लघवीमध्ये बराच काळ बुडबुडे किंवा फेस येत असेल तर ती प्रोटीन्युरियाची समस्या असू शकते. या स्थितीत शरीर शरीरातून अतिरिक्त प्रथिने बाहेर टाकण्यास सुरुवात करते. खरं तर, जेव्हा मूत्रपिंड योग्यरित्या काम करत नाही तेव्हा प्रथिने लघवीत जाऊ लागतात. बराच काळ लघवीमध्ये बुडबुडे आणि फेस येण्याच्या समस्येकडे दुर्लक्ष करू नका आणि आपल्या डॉक्टरांना वेळीच भेट द्या

प्रोटीन्युरिया म्हणजे काय?

आपल्या शरीरात रक्तात प्रथिने असतात आणि मूत्रपिंड त्यांना परत रक्तात फिल्टर करतात जेणेकरून ते मूत्रात जाऊ नयेत.

## ०७ लाख हजार ९९ रुपयांचे एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज ,एक गावठी पिस्टल जप्त. ०३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल. उहेज्ञरीं स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

लातूर :- ०७ लाख हजार ९९ रुपयांचे एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज ,एक गावठी पिस्टल जप्त. ०३ जणांविरुद्ध गुन्हा दाखल.

वरिष्ठांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेने लातूर शहरातील एल.आय. सी कॉलनी परिसरात कारवाई करत ०७ लाख ९९ हजार ९०० रुपये किमतीचा ७८ ग्रॅम मेफेड्रोन म्हणजेच एमडी ड्रग्स जप्त.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात लातूर पोलिसांकडून अवैध धंद्यावर मोठ्या प्रमाणात छापेमारी करून गुन्हे दाखल करण्यात येत असून त्या अंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेला मिळालेल्या माहितीवरून वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वातील पथकाने दिनांक १०/०७/२०२५ रोजी दुपारी ०३ वाजण्याच्या सुमारास एल.आय. सी कॉलनी परिसरातील एका घरा मध्ये इसम नामे गणेश अर्जुन शेंडगे, वय २६ वर्ष, राहणार एल.आय.सी कॉलनी,लातूर, रणजीत तुकाराम जाधव वय २४ वर्ष, राहणार दहिसर केकतीपाडा, गुणुबुवा कंपाऊंड, गोदावरी राणीचाळ, दहिसर पूर्व, मुंबई, एक फरार आरोपी

असे असल्याचे सांगितले. वर नमूद आरोपींनी एमडी (मेफेड्रोन) ड्रग्सची अवैध विक्री करणे साठी स्वतःच्या घरामध्ये बाळगलेले अंमली पदार्थ एकूण ७८.७८ ग्रॅम वजनाचा ३,९३,९०० रू. किमतीचा अंमली पदार्थ एमडी ड्रग्स, गुन्हयात वापरलेले वेगवेगळ्या कंपनीचे मोबाईल, रोख रक्कम असा एकूण ०७ लाख ९९ हजार ९०० रुपयांचा अमली पदार्थ एमडी (मेफेड्रोन) ड्रग्ज हस्तगत करण्यात आला आहे.

एमडी ड्रग्सची विक्री करताना,व गावठी पिस्टल बाळगलेले मिळून आलेले ०३ जणा विरुद्ध पोलीस ठाणे विवेकानंद चौक पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून त्यांना गुन्ह्यात अटक करण्यात आलेली आहे. तर फरार आरोपीचा शोध सुरू आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक डॉ.अजय देवरे यांचे मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक सुधाकर बावकर यांच्या पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक माणिक डोके, सदानंद भुजबळ, पोलीस उपनिरीक्षक राजाभाऊ घाडगे, पोलीस अंमलदार राहुल सोनकांबळे, साहेबराव हाके, रियाज सौदागर, माधव बिलापट्टे, तुराब पठाण, मनोज खोसे, गोविंद भोसले, नवनाथ हासबे , नाना भोंग, मोहन सुरवसे, सचिन धारेकर, महादेव शिंदे, बंडू नीटुरे, सचिन मुंडे यांनी केली आहे.

# शिक्षण उपसंचालक संदीप सांगवेचा कोट्यवधींचा गैरव्यवहार:भाजप आमदाराने मांडली लक्ष्यवेधी, शिक्षणमंत्र्यांकडून तत्काळ निलंबनाची घोषणा

मुंबई- शिक्षण विभागातील भ्रष्टाचाराचा गंभीर मुद्दा आज विधानसभेत मांडण्यात आला. भाजप आमदार संजय उपाध्याय यांनी मुंबईचे शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर थेट कोट्यवधी रुपयांच्या आर्थिक गैरव्यवहाराचे आरोप करत सभागृहात लक्षवेधी उपस्थित केली. या गंभीर आरोपांच्या पार्श्वभूमीवर शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी सांगवे यांच्या निलंबनाची घोषणा करत, विशेष चौकशी समितीमार्फत सखोल तपास करण्याचे आश्वासन दिले आहे.

भाजपचे आमदार संजय उपाध्याय यांनी मुंबई शिक्षण उपसंचालक संदीप सांगवे यांच्यावर गंभीर आरोप करताना म्हटले की, महापॉवरफुल अधिकारी माझे कोणी काही करू शकत नाही असे वारंवार बोलून दाखवतो. मागील तारखा टाकून लाखो रूपये उचलत शेकडो फाईल मंजूर केल्या आहेत. या अधिकाऱ्याने शासनाच्या तिजोरीचे कोट्यवधी रूपयांचे नुकसान केले आहे.

हा इतका पावरफुल अधिकारी कसा काय?

संजय उपाध्यय पुढे म्हणाले, संदीप सांगवे यांची लक्षवेधी लागली तर याचे अनेक दलाल माझ्याकडे आले. ही लक्षवेधी सभागृहात मांडूच शकणार नाही असे खुले आव्हान मला या अधिकाऱ्याने दिले होते. महापालिकेतील अधिकारी माझ्यावर रेकी करत होते. एकही आमदार माझ्या विरोधात काही करू शकणार नाही, असे वारंवार आव्हान दिले गेले. चौकशी चालू असताना या अधिकाऱ्याने सरसकट चुकीच्या मान्यता दिल्या, असा आरोपही संजय उपाध्यय यांनी केला. संदीप सांगवे हा अधिकारी १३ वर्षे एकाच खात्यात आहे. माझ्याविरोधात प्रश्न विचारू नका, तुमचे सगळे काम करून देतो अशी थेट ॲफर करतो. हा इतका पावरफुल अधिकारी कसा काय? असा प्रश्न यावेळी संजय उपाध्यय यांनी विचारला.



रणधीर सावरकर यांचाही गौप्यस्फोट

संदीप सांगवे हा अधिकारी अख्खी विधानसभा ताब्यात घेण्यासाठी दोन-पाच कोटी घेऊन फिरतोय अशी चर्चा सुरू आहे, असा गौप्यस्फोट यावेळी आमदार रणधीर सावरकर यांनी केला. काय म्हणाले दादा भुसे?

या प्रकरणाची चैकशी करण्यासाठी आयएस अधिकारी, आयपीएस आणि शिक्षण तज्ञ यांची एसआयटी स्थापन करुन चौकशी केली जाईल. कोणालाही पाठीशी घातले जाणार नाही. तोपर्यंत संबधित अधिकारी संदीप सांगवेला निलंबित करण्यात येत आहे, असे दादा भुसे म्हणाले.

अभिव्यक्ती स्वातंत्र्यावर गदा आणण्याच्या चर्चेमुळे वादग्रस्त ठरलेले महाराष्ट्र विशेष जनसुरक्षा विधेयक आज विधानसभेच्या पटलावर सादर करण्यात आले. देशविरोधी कृत्य करणाऱ्या व्यक्ती अथवा संघटनांना आळा घालण्याच्या उद्देशाने हे विधेयक आणण्यात आले आहे. विरोधकांनी जे जे सांगितले ते सर्व मान्य करण्यात आले आहे, असे फडणवीस या विधेयकाचे समर्थन करताना म्हणाले. जनसुरक्षा विधेयकासाठी तब्बल साडेबारा हजार हरकती आणि सूचना देखील आल्याची माहिती यावेळी समोर आली आहे. तसेच, मुख्यमंत्र्यांनी याप्रसंगी संयुक्त चिकित्सा समितीचेही आभार व्यक्त केले.

## पुण्यातील सर्वात मोठ्या हिंजवडी पार्कमध्ये झालेल्या नंतर सरकारने घेतला अत्यंत महत्वाचा निर्णय

पुण्यात असेल्या भारतातील सर्वात मोठ्या हिंजवडी खढ पार्कमध्ये झाला होता. या नंतर सरकारने अत्यंत महत्वाचा निर्णय घेतला आहे. हिंजवडी खढ पार्कमधील सर्व समस्या मार्गी लागणार आहेत.

हिंजवडी आयटी पार्कसंदर्भात सरकारने क्शन प्लान बनवला आहे. हिंजवडी खढ पार्कमध्ये अनेक बड्या नॅशमल इंटरनॅशनल खढ कपंन्या आहेत. मात्र, येथील खढ कंपन्यांना अनेक अडचणींचा सामना करावा लागतो.

हिंजवडी खढ पार्कमधील समस्या सोडवण्यासाठी सरकाने क्शन प्लान बनवला आहे. पायाभूत सुविधा डिसेंबर अखेरपर्यंत पुर्ण करणे, खड्ड्यांच्या समस्या सोडवण्यास प्राधान्य देणे सोबतच, मेट्रोचे काम देखील त्वरीत पूर्ण करण्याच्या सूचना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिल्या आहेत. पाणी साचू नये यासाठी सल्लागार समितीची नियुक्ती करण्यात आली आहे. ज्याद्वारे हिंजवडीत पाणी साचणार नाही यासाठीचा अहवाल ही सल्लागार समिती देणार आहे. ग्रामपंचायत, एमआयडीसी आणि महापालिकेत समन्वय करण्यासाठी एका अधिकाऱ्यावर जबाबदारी दिली जाणार आहे. उपमुख्यमंत्री अजित पवार, यांच्यासह बैठकीला स्थानिक लोकप्रतिनिधींची देखील उपस्थिती होते.

महापारेषण कंपनीच्या २२० केव्ही इन्फोसिस ते २२० केव्ही पेगासस अतिउच्चदाब भूमिगत वीज वाहिनीत ६ जून दुपारी २.१० च्या सुमारास बिघाड झाल्यामुळे महापारेषणकडून महावितरणच्या एमआयडीसी आणि आयटी पार्क भागातील ९१ उच्चदाब आणि सुमारे १२ हजार लघुदाब वीजग्राहकांचा वीजपुरवठा विस्कळित झाला होता. पर्यायी मार्गाने वीजपुरवठा पूर्ववत केला जातोय, पण कंपन्यांना लागणारी वीज पुरेशी होत नाही. महापारेषण कंपनीने नियोजित



देखभाल, दुरुस्तीच्या कामासाठी रविवारी सकाळी ११ ते दुपारी १ असा वीजपुरवठा बंद केला होता. तशी सूचना वृत्तपत्रांमध्येही प्रसिद्ध केली होती. मात्र देखभाल दुरुस्तीचे काम आटोपून वीजपुरवठा सुरु करताना दुपारी २.१० वाजेच्या सुमारास २२० केव्ही इन्फोसिस ते २२० केव्ही पेगासस अतिउच्चदाब भूमिगत वीज वाहिनीत मोठा बिघाड झाला. परिणामी महावितरणच्या ग्राहकांना वीजपुरवठा करणाऱ्या २२ केव्हीच्या २५ वाहिन्या, अतिउच्चदाबचे इन्फोसिस व नेक्सट्रा हे दोन ग्राहक अशा ९१ उच्चदाब आणि सुमारे १२ हजार लघुदाब ग्राहकांचा वीजपुरवठा विस्कळित झाला. यामुळे हिंजवडीतील इंटनॅशनल कंपन्या ठप्प झाल्या होत्या.

# लातूर जिल्हा रुग्णालयाच्या प्रश्नासंदर्भात काँग्रेसकडून शासनाच्या परिपत्रकाची होळी करीत जाहीर निषेध.

## जिल्हाधिकारी लातूर यांना मागण्याचे निवेदन सादर,शासन आदेश रद्द न झाल्यास तीव्र आंदोलनाचा इशारा





लातूर / प्रतिनिधी :– राज्याचे माजी मंत्री आमदार अमित विलासरावजी देशमुख यांनी नुकतेच आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांची भेट घेऊन अनेक दिवसापासून जिल्हा रुग्णालयाच्या जागेबाबत कृषी विद्यापीठाला वर्ग होणाऱ्या निधीबाबत लवकरात लवकर तोडगा काढण्याची विनंती केली होती. त्यानंतर शासनाने कृषी विद्यापीठाला निधी वर्ग केला व लातूरच्या जिल्हा रुग्णालयाला जागा हस्तांतर करण्यात आली. मात्र जागा हस्तांतर होऊनही जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाचे काम सुरू झाले नाही. यापूर्वीच लातूर जिल्हा रुग्णालयाला बांधकामासाठी निधीही मंजूर आहे. राज्य शासनाने २५ मे रोजी एक परिपत्रक जाहीर करत आरोग्य खात्या अंतर्गत कोणत्याही बांधकामाला यापुढे परवानगी देण्यात येणार नाही असे आदेश निर्गमित केले. माझं लातूर या सामाजिक परिवारा मार्फत लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न गेली अनेक वर्ष लावून धरलेला असून जागेच्या हस्तांतराचा प्रश्न संपल्यानंतर लवकरात लवकर लातूर जिल्हा रुग्णालयाचा प्रश्न निकाली निघेल असे वाटत असतानाच शासनाच्या या परिपत्रकामुळे लातूरमध्ये शासनाच्या विरोधात असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून आज लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने लातूरच्या जिल्हाधिकारी कार्यालया समोर शासनाच्या या परिपत्रकाची होळी करत जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला.तसेच जिल्हाधिकारी लातूर यांची भेट घेऊन काँग्रेस पक्षाच्या वतीने निवेदन सादर करण्यात आले. काँग्रेस पक्षाच्या वतीने दिलेल्या निवेदनात शासनाने हे परिपत्रक परत घ्यावे व लातूर जिल्हा रुग्णालयाच्या बांधकामाला लवकरात लवकर सुरुवात करावी अन्यथा काँग्रेस पक्ष शासनाच्या विरोधात तीव्र आंदोलन करेल असा इशारा देण्यात आला.

यावेळी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष ड.किरण जाधव,माजी उपमहापौर कैलास कांबळे, डॉ.बालाजी सोळुंके,सुपर्ण जगताप,इम्रान सय्यद,प्रा. प्रवीण कांबळे,प्रवीण सूर्यवंशी,आसिफ बागवान, गोरोबा लोखंडे,आयुब मणियार,पप्पू देशमुख,विजय गायकवाड,दत्ता सोमवंशी,सिकंदर पटेल,गिरीश ब्याळे,सुंदर पाटील कव्हेकर,बालाजी गवळी,ड. गणेश कांबळे,तबरेज तांबोळी,हमीद बागवान,प्रा. संजय ओहोळ, जी ए गायकवाड,सत्यवान कांबळे,राजकुमार कत्ते, विजय टाकेकर, पिराजी साठे,पवन बनसोडे,असलम शेख,अबू मणियार,सुरज राजे यांच्यासह लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अनेक पदाधिकारी,कार्यकर्ते उपस्थित होते.

## तुकडाबंदी कायदा रद्द करण्याचा निर्णय स्वागतार्ह–डॉ.हुलगेश चलवादी

पुणे / प्रतिनिधी:– तुकडाबंदी कायदा रद्द करण्याची घोषणा राज्याच्या महसूल मंत्र्यांनी विधानसभेत केली.शहरी भागात गुंठ्यात जमीन खरेदी–विक्रीसाठी ७८ वर्षांपूर्वी केलेला हा कायदा डोकेदुखी ठरत होता.वर्षाच्या सुरुवातीलाच हा कायदा रद्द करण्याची मागणी बहुजन समाज पक्षाने केली होती.कायदा रद्द करण्याच्या दिशेने सरकारने टाकलेले पाऊल स्वागतार्ह आहे,असे प्रतिपादन पक्षाचे प्रदेश महासचिव,पश्चिम महाराष्ट्र झोन प्रभारी डॉ. हुलगेश चलवादी यांनी गुरुवारी (ता.१०) केले.

राज्यातील जमीन खरेदी–विक्रीसंबंधीचे सरकारी धोरण आतापर्यंत बिल्डरांसाठी पोषक आणि गरीब; मध्यमर्गीयांसाठी मारक होते. सर्वसामान्यांना त्यांचे स्वप्नातील घर बांधता यावीत याकरिता शहर, उपनगरांमध्ये गुंठे खरेदी–विक्री नियमांत बदल काळाची गरज होती.केवळ विकासकांना लाभ पोहोचवणारी, त्यांच्या सदनिका विक्रीत वाढ करण्यासाठी विद्यमान प्रक्रिया कार्यान्वित होती, असा आरोप डॉ.चलवादी यांनी केला.

राज्यातील तब्बल ५० लाखांहून अधिक नारिकांना कायदा रद्द करण्यात आल्याने फायदा होईल.सरकारने १२ जुलै २०२१ च्या परिपत्रकानुसार एक, दोन, तीन अशा गुंठ्यांमध्ये शेतजमीन खरेदी विक्री करण्यावर निर्बंध घातले होते. परंतु, तीव्र विरोधानंतर यात सुधारणा करीत जिरायत जमिनीसाठी २० गुंठे, तर बागायत जमिनीसाठी ११ गुंठे अशी मर्यादा ठरविली होती.मात्र, आता हा कायदाच रद्द करण्यात येणार असल्याने शहरी भागात १ गुंठा जमीन खरेदी–विक्रीची मुभा मिळेल,असे डॉ.चलवादी यांनी स्पष्ट केले.

सर्वसामान्यांची फसवणूकीतून सुटका होणार!

कुठलाही सर्वसामान्यान व्यक्ती ११ गुंठे जमीन खरेदी करून शकत नाही. गुंठे–दोन गुंठे जमीन घेवून ही मंडळी आपल्या स्वप्नातील घर बांधतात. परंतु, तुकडाबंदी कायद्यामुळे खरेदी–विक्री व्यवहार सुरु असले तरी जमिनीचे तुकडे नियमित होत नव्हते. अशात 'पॉवर ऑफ अटर्नी' अथवा 'करारनामा' करीत जमीन खरेदी करण्याशिवाय कुठला पर्याय सर्वसामान्यांसमोर उरत नसत.या प्रक्रियेमुळे खरेदीदाराचे सात बाऱ्यावर नाव चढत नव्हते. जमिनदार याचा फायदा घेत एकच जमीन अनेकांना विक्री करीत त्याची फसवणूक करायचे.अशा प्रकारातून आता नागरिकांची सुटका होईल, असा विश्वास डॉ.चलवादी यांनी व्यक्त केला.

# हक्क आणि कर्तव्यासोबत स्वच्छता कामगारांनी कर्तव्याची जाणीव ठेवावी : कामगार नेते राजकुमार होळीकर यांचे प्रतिपादन

## घंटागाडी स्वछता कंत्राटी कामगारांनी केला कामगार नेते राजकुमार होळीकर यांचा सत्कार





लातूर / प्रतिनिधी :– आपल्या समस्या सोडवून सन्मानाने जगण्यासाठी कामगारांनी संघटित होऊन संघर्षाची तयारी ठेवावी तसेच आपले हक्क आणि अधिकारासोबतच कर्तव्याचीही जाणीव ठेवावी. कामगारांची शक्ती आणि अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे किमान वेतन, इपीएफ व इतर मागण्या लातूर महानगरपालिकेने मंजूर केल्या. अजून काही महत्वपूर्ण मागण्या आहेत त्यासाठी स्वछता कंत्राटी कामगारांनी संघटित राहण्याची गरज आहे. असे प्रतिपादन कामगार नेते तथा अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजकुमार होळीकर यांनी येथे केले. कामगार नेते राजकुमार होळीकर यांनी गेल्या १० जूनला कामबंद आंदोलन करून मनपाच्या घंटागाडी स्वछता कंत्राटी कामगारांना किमान वेतन व इतर मागण्या मंजूर करवून घेतल्या. न्याय मिळवून दिला. त्याबद्दल लातूर शहरातील वार्ड क्र. १० ते १५ मधील मनपा घंटागाडी स्वछता कंत्राटी कामगारांच्या वतीने कामगार नेते राजकुमार होळीकर यांच्या जाहीर सत्काराचे आयोजन लातूर येथील हॉटेल गंधर्वच्या सभागृहात ८ जुलै रोजी करण्यात आले होते. त्याप्रसंगी सत्काराला उत्तर देताना ते बोलत होते. यावेळी मनपा घंटागाडी स्वछता कंत्राटी कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

होळीकर पुढे म्हणाले, लातूर शहराचे व नागरिकांचे आरोग्य राखण्याचे काम गेल्या अनेक वर्षांपासून आपण करत आहात. तुमच्या कष्टामुळे, योगदानमुळेच लातूर मनपाला देशातील सर्वोच्च पुरस्कार मिळालेला आहे. देशाचे पाहिले कायदेमंत्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी कामगार हिताचे अनेक कायदे केलेले आहेत. त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे, यासाठी आपणास संघटित होऊन लढा द्यावा लागेल, त्याशिवाय आपली उन्नती होणार नाही.

यावेळी उपस्थित सर्व कामगारांच्या वतीने राजकुमार होळीकर यांचा पुष्पहार, शाल, श्रीफळ देऊन तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची मूर्ती व संविधान प्रस्ताविका भेट देऊन जाहीर सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे संयोजन व सूत्रसंचालन अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेचे शहर सचिव महेंद्र कांबळे यांनी केले. यावेळी माजी नगरसेविका आयोध्याताई अग्रवाल, अखिल महाराष्ट्र जनरल कामगार संघटनेच्या केंद्रीय सदस्या मंगलताई शिंदे, कोषाध्यक्ष नूतन अंगरखे, अंजनाताई सगट, लताताई रसाळ, अंकुश टकळगे, शिंदे अण्णा, सिंकंदर लोखंडे, नामदेव गायकवाड, अमोल शिंदे, पंडित गायकवाड, परमेश्वर कांबळे, कुमार कांबळे, बबन गायकवाड, कुमार भाऊ कांबळे, रोहित कांबळे, रणजित चव्हाण, चंद्रपाल गिरी, किशोर सगर, अभिजित बनसोडे, सुधीर कांबळे, आयुब शेख, आदिसह कामगारांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# उघड्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही कचरा घंटागाडीतच टाकण्याचे मनपाचे आवाहन







लातूर /प्रतिनिधी : – शहरात उघड्यावर कचरा टाकणाऱ्या नागरिकांच्या विरोधात मनपाकडून कारवाई केली जात आहे.या अंतर्गत शहरातील प्रभाग क्रमांक १८ मध्ये नागरिकावर दंडात्मक कार्यवाही करण्यात आली.

मनपाच्या वतीने शहरात दैनंदिन कचरा संकलन केले जाते. तरीसुद्धा काही ठिकाणी नागरिक उघड्यावर कचरा टाकत असल्याचे निदर्शनास येत आहे.यामुळे मनपा आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी व उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.

प्रभाग क्रमांक १८ मधील दुर्गादेवी चौक येथे कचरा उघड्यावर टाकल्याचे निदर्शनास आल्यानंतर मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख,स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे,प्रमुख स्वच्छता निरीक्षक धोंडीबा सोनवणे, स्वच्छता निरीक्षक चंद्रकांत भोसले, संतोष रणदिवे व कर्मचाऱ्यांच्या उपस्थितीत ही कारवाई करण्यात आली. शहरातील नागरिकांनी आपल्याकडील कचरा ओला व सुका असे वर्गीकरण करून घंटागाडीतच टाकावा. यापुढे उघड्यावर कचरा टाकणाऱ्यावर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल, असा इशारा पालिकेच्या वतीने देण्यात आला आहे.

नेहमी कचरा पडणारी ठिकाणे स्वच्छ करून त्या ठिकाणी वाचन कट्टा व वृक्ष लागवड करण्याचा उपक्रम पालिकेने हाती घेतला आहे. या अंतर्गत प्रभाग क्रमांक ८ मधील झिंगणप्पा गल्ली भागात अग्रसेन भवन, प्रभाग क्रमांक ९ मध्ये बसवेश्वर महाविद्यालय व प्रभाग क्रमांक १२ मधील चंद्रोदय कॉलनी येथे स्वच्छता करून वाचनकट्टा तयार करण्यात आला. वृक्ष लागवड ही करण्यात आली.यावेळी मुख्य स्वच्छता अधिकारी कलीम शेख, स्वच्छता विभाग प्रमुख,रमाकांत पिडगे, क्षेत्रीय अधिकारी विजय राजूरे, प्रमुख स्वच्छता निरीक्षक अक्रम शेख,रवी कांबळे,डी.एस सोनवणे,स्वच्छता निरीक्षक अमजद शेख,मनाहेर शिंदे,अमोल मगर,देवेंद्र कांबळे,महादेव फिस्के,गजानन सुपेकर,शिवाजी कुटकर,सुरेश कांबळे,धनराज गायकवाड, बालाजी राऊत व मुन्ना पाल उपस्थित होते.


## जनकल्याण निवासी विद्यालयातील रूग्ण सहाय्यक अभ्यासक्रमाच्या निकालाची परंपरा कायम .



लातूर :– हरंगुळ(बु) येथील जनकल्याण निवासी विद्यालयातील यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाचा रूग्ण सहाय्यक अभ्यासक्रमाच्या निकालाची परंपरा कायम. जनकल्याण निवासी विद्यालयात वात्सल्य ट्रस्ट, मुंबई, विवेकानंद रूग्णालय, लातूर यांच्या सहकार्याने यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठ चा रूग्ण सहाय्यक अभ्यासक्रम मागील ४ वर्षीपासून सुरू आहे. या परिक्षेत अभ्यासक्रमाच्या २ विद्यार्थिनींनी ९० टक्यांपेक्षा अधिक गुण घेतले. तर १६ विद्यार्थिनींनी ९० ते ८० टक्के मध्ये गुण संपादन केले आहेत. या परीक्षेसाठी २९ विद्यार्थिनी बसल्या होत्या. यातील विशेष प्राविण्यासह सर्व २१ विद्यार्थिनींनी उत्तीर्ण झालेल्या आहेत.

कु. समिक्षा मारुती नेवल हिने ९२.३३ टक्के घेऊन केंद्रातून सर्वप्रथम तर कु. वृषाली गोरख शिंदे हिने ९१.६७ टक्के घेत सर्व द्रितीय आली आहे. अभ्यासक्रम समन्वयक म्हणून सौ. शितलताई नामवाड,सौ.प्रतिक्षाताई चेंडकापुरे यांचे प्रकल्प अध्यक्ष मा. प्रकाशजी लातूरे , उपाध्यक्षा डॉ.लिलाताई कर्वा, प्रकल्प कार्यवाह श्री राजेशजी सुगरे, सहकार्यवाह श्री. उमेशजी सेलूकर ,शालेय समिती अध्यक्ष श्री . सतिशजी कुलकर्णी,वसतीगृह समिती अध्यक्ष श्री .प्रशांतजी मेतकुटे ,मुख्याध्यापक , अधीक्षक, सहअधीक्षक यांनी अभिनंदन व कौतुक केले.

## जगद्गुरु संत तुकाराम महाराजांच्या गाभार्यास विड्याच्या पानांची सजावट श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा उत्साहात साजरी



केज/प्रतिनिधी केज तालुक्यातील प्रतिदेहु श्रीक्षेत्र संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमा हजारो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहाने साजरी करण्यात आली. गुरूवर्य महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांच्या मार्गदर्शनाखाली गरूपोर्णिमेच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यानिमित्ताने जगद्गुरु संत तुकाराम महाराजांचा गाभारा हजारो विड्याच्या पानांनी सजवण्यात आला. संत तुकोबाराय पावनधाम येथे गुरुपौर्णिमे निमित्त आलेल्या भक्तांनी संत तुकाराम महाराजांच्या दर्शना बरोबरच गुरूवर्य महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांचे आशीर्वादही घेतले. याप्रसंगी महंत महादेव महाराज बोराडे शास्त्री यांची किर्तन सेवा संपन्न झाली. पावनधाम येथे आलेल्या हजारो भाविकांच्या प्रसादाची व्यवस्था सौ.स्मिता लोमटे यांनी केली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी अमोल महाराज ,अशोक महाराज ,जनार्धन महाराज,सिरसट महाराज, प्रशांत महाराज निगडे,गणेश महाराज भगत, शाम महाराज भिसे,गोविंद शिनगारे आणि सर्व स्वयंसेवकांनी प्रयत्न केले.

## आरपीआयच्या मराठा आघाडीच्या केज तालुकाध्यक्षपदी महादेव ढवारे यांची निवड




केज/प्रतिनिधी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (अ) केज तालुका मराठा आघाडीची कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून केज तालुकाध्यक्षपदी महादेव ढवारे यांची निवड करण्यात आली आहे. रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे पक्ष अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब व मराठा आघाडी महाराष्ट्र अध्यक्ष बाबासाहेब मिरजे पाटील यांच्या आदेशानुसार महादेव ढवारे यांची निवड करण्यात आली. महादेव ढवारे हे केज तालुक्यातील कळबाआंबा येथील रहिवाशी आहेत ते गेल्या अनेक वर्षापासून चळवळीत सक्रिय आहेत त्यांनी अनेक गोरगरिबांचे कामे मार्गे लावलेले आहेत त्यांच्या कार्याची दखल घेत बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदिपान तात्या हजारे व आर पी आय चे केज तालुकाध्यक्ष सुनील हिरवे यांनी केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांच्याकडे ढवारे नावाची शिफारस केली असता केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांनी महादेव ढवारे यांची मराठा आघाडीच्या केज तालुकाध्यक्षपदी निवड करण्याचे आदेश दिले.

बीड जिल्हा कार्याध्यक्ष संदिपान तात्या हजारे, मराठा आघाडीचे जिल्हाध्यक्ष नवनाथ तपसे,केज तालुकाध्यक्ष सुनील हिरवे यांच्या उपस्थित महादेव श्रीरंग ढवारे यांना फेटा,शाल,पुष्पगुच्छ व निवडीचे पत्र देऊन महादेव ढवारे यांची केज तालुका मराठा आघाडीच्या तालुकाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली. यावेळी व्यंकट हजारे, बाबुराव गालफाडे, अमोल मस्के, सुधीर हजारे, भारत इंगळे, गोटू हजारे, शैलेश हजारे यांच्यासह कार्यकर्ते उपस्थित होते. यावेळी बोलताना महादेव ढवारे म्हणाले की, रिपाईचे पक्ष अध्यक्ष तथा केंद्रीय मंत्री रामदासजी आठवले साहेब यांनी माझ्यावर विश्वास ठेवून जे जबाबदारी दिली आहे ती मी समर्थपणे पार पाडेल व केज तालुक्यामध्ये पक्ष वाढीसाठी तत्पर्तने काम करून पक्षाचे विचार सर्वसामान्य नागरिकांपर्यंत पोहोचण्याचे काम प्रामाणिक पणे करेल.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE